PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 6

# राष्ट्रीय कृषी धोरण व झालेल्या प्रभावाचे अध्ययन

**डॉ. नीता धर्माधिकारी**
**असोसिएट प्रोफेसर**
**जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्स**
**नागपूर (महाराष्ट्र) भारत**

## सारांश:-

कृषी अर्थव्यवस्थेच्या विकासावर देशाच्या सरकारी धोरणाचा प्रभाव पडतो. भांडवलवादी राष्ट्रात सरकार कृषी उत्पादनाचे मूल्य निर्धारित करून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. भारत हा विकसनशील देश आहे, त्यामुळे कृषीच्या विकासासाठी सरकारी धोरण आखणे महत्वाचा टप्पा आहे. कृषकांना खाद्यान्नात आत्मनिर्भरता देणे, कच्च्या मालाची उपलब्धतता करून देणे, श्रमिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, ग्राहकांना योग्य दराने वस्तू देणे, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे हे महत्वपूर्ण उद्देश धोरणाद्वारे साध्य होऊ शकतात. कृषी क्षेत्राचे व्यापक स्वरूप पाहता त्यात सरकारच्या सहकार्याशिवाय कृषीचा विकास करणे शक्य नाही. कृषी व कृषी सहाय्यक क्षेत्राच्या विकासाकरिता सरकारची भूमिका महत्वाची आहे. कृषी धोरणात अल्पविकसित राष्ट्रांमध्ये कश्या प्रकारे राबवितात व तिचा प्रभाव कसा होऊ शकतो, याचे अध्ययन या पेपरमध्ये करण्यात आले आहे.

**मूळशब्द:-** कृषी, अर्थव्यवस्था, धोरणे, सरकार, विकास

## प्रस्तावना:-

सामान्य माणूस स्वत:साठी व त्याच्या परिवारासाठी कामकरीत असतो. तो उच्च राहणीमानाची किमान आंस धरून बसतो. त्याच्या अपेक्षा आणि त्या पूर्ण करण्याकरिता उपलब्ध संसाधन याचे

गुणोत्तर कधीच जमत नाही. परिणामत: सर्वांचा अपेक्षा भंग होतो. मनुष्याच्या अपेक्षा या वेळोवेळी बदलत असतात. प्रत्येकाच्या त्या वेगवेगळ्या असतात. परंतु संपूर्ण विश्वाची एक जी अपेक्षा आहे ती म्हणजे राष्ट्राच्या भौतिक स्तिथीमध्ये सुधारणा होणे ही होय. मनुष्याच्या अन्न, वस्त्र, निवारा या आवश्यक गरजा व्यतिरिक्त शिक्षण घेणे, सन्मानाचे जीवन जगणे ई. अपेक्षा आहे. अर्थव्यवस्थेची विकास गती धिमी होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे विषमता, संपत्तीचे असमान वितरण हे होय. श्रीमंत अवाढव्य पैसा जमवतात व हौसमौज करीत आहे आणि दुसरीकडे आवश्यक गरजाही पूर्ण न होणारी जनता आहे.

प्राचीन काळात मनुष्याच्या गरजा ह्या मर्यादित होत्या, परंतु विकासाबरोबरच गरजाही वाढू लागल्या. तंत्रज्ञानात प्रगती झाली त्यामुळे जीवनशैलीत बदल झाला व अपेक्षाही बदल्या. राजकीय नेते निवडणुकीपुर्वी नेहमीच जनतेला आश्वासन देतात कि, आम्ही तुम्हाला आधुनिक सोयीसुविधा देऊ विकासाचे कार्यक्रम राबवू सुधारणा केल्या जातील , पण हे आश्वासनच राहते.

मनुष्य प्राणी हा विकासाचे कारण आणि परिणाम आहे. विकास प्रक्रिया ही मनुष्यकेंद्रित आहे. देशाच्या आर्थिक स्तिथीवर पूर्णत: त्याची मालकी व नियंत्रण असते. सर्वांचा विकासाठी समानता आणि सन्मान या तत्वांना महत्व देऊन करावा, त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संबंध सुधारतील व ऐक्याची भावना निर्माण होईल.

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीवर अवलंबून आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता शेतीची भूमिका ही महत्वपूर्ण आहे. साधारणत: ७०% लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन कृषी आहे. विकासदरात शेतीचे महत्वपूर्ण योगदान असूनही कृषीमध्ये सुधरणा अजूनही नाही. म्हणजे जमिनीचे होणारे विभाजन, त्यामुळे झालेले लहान लहान तुकडे, शेतीकरण्याची जुनाट पद्धती, योग्य माहितीचा अभाव, आर्थिक स्तिथी, अंधविश्वास, सिंचन सुविधा, लागवडी खालील जानिमिचा स्तर , बी-बियाणे, रासायनिक खते, अवजारे, ई. च्या कमतरतेमुळे शेती हा व्यवसाय अडचणीत आला आहे व मिळणाऱ्या उत्पादनात घट झाली आहे. कृषी व अकृषी क्षेत्रातील समन्वय नाही, समन्वयाच्या अभावामुळे जमीनदारांच्या हाती सत्ता आली. स्थानिक पातळीवर तेथे उपलब्ध असलेली नैसर्गिक संसाधनावर विकास अवलंबून असतो. भारतातील लोकसंख्या व रोजगार यातील संबंध विकास दर ठरवितो. शेतीतील उत्पादनाच्या

तुलनेत ग्रामीण भागात मजुरांची संख्या जास्त आहे. कसायला जमीन नसणे, आहे तीच अवस्थेमुळे असते.

अल्पविकसित देशात जनतेला वितरण करण्याकरिता रेशनिंग प्रणाली आली. धान्याची आयात सरकारद्वारा होऊ लागली. पारंपारिक जमीनदारी पद्धतीचे निर्मुलन, शेतकऱ्यांना नवनवीन सुविधा प्रदान करणे, सहकारी तत्वावर कृषी करणे, भिमिहिनांना शेतकऱ्यांची स्तिथीत सुधारणा करणे, अन्य पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे. नाबार्डची भूमिका महत्वपूर्ण आहे. शेतकऱ्यांना कर्ज नाबार्डद्वारे दिल्या गेले. कालवे, बांध बांधणे, नियंत्रित बाजारपेठांची निर्मिती करणे, संग्रहण, शितगृहे, गोदाम बंधने, परिवहन, संदेशवहन, शिक्षण, पाणी, ग्रामीण रस्ते, घरे, ई. आवश्यक गरजाही सरकारद्वारा उपलब्ध करून देणे गरजेचे झाले आहे. जो पर्यंत सरकार या बाबत योग्य कार्यक्रम राबविणार नाही तोपर्यंत विकास होणे अशक्य आहे.

**अध्ययनाचा उद्देश:-**

१. कृषी स्तिथीचा अभ्यास करणे.

२.कृषी धोरणांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**अध्ययन पद्धती:-**

हा पेपर पूर्णत: दुयां स्त्रोतावर आधारित आहे. पेपरमध्ये काही पुस्तके, न्युज पेपर. मासिकांतील विषयाशी संबंधित उपलब्ध माहितीचा आधार गेण्यात आला आहे.

**गृहीतक:-** ग्रामीण क्षेत्रात कृषीच्या स्तिथीत परिवर्तन करण्याकरिता कृषी धोरणांची गरज आहे.

भारत हा विकसनशील देश असून आर्थिक विकास हा पायाभूत संरचना, संस्थागत सुधारणा, नैसर्गिक साधन यावर अवलंबून आहे. स्वातंत्र्याआधी इंग्रजाचे आधिपत्य होते. कृषीच्या विकासाच्या प्रती त्यांचा दृष्टीकोन उदासीन होता. साधनांची मागणी व पुरवठा यात संतुलन नव्हते. वेळोवेळी पडणारा दुष्काळ, पूर, नैसर्गिक आपत्ती, भूकंप ई. कृशाकांना सामना करावा लागत होता. इंग्रजाचे कृषिविषयक धोरण उपेक्षा पूर्ण असल्याने शेतीबाबत कोणतीच अपेक्षा नव्हती.

वर्षोनुवर्षे कृषीकडे दुर्लक्ष झाले व जेव्हा महाभयंकर दुष्काळ आला. तेव्हा ब्रिटीशांचे लक्ष शेतीकडे गेले. परिणामत: १८७१ मध्ये त्यांनी कृषी आणि व्यवसाय विभागाची स्थपना केली. कृषी

कायद्यातही सुधारणा केली. १९०४ मध्ये सहकार प्रत्यय समिती कायदा पास केला. १९०५ मध्ये कृषी विभागाचे पुनर्गठन केला, १९०६ मध्ये चार कृषी विद्यापीठांची स्थापना केली. १९२३ मध्ये राजकीय कृषी आयोगाची नियुक्ती केली. तिच्यामध्ये गावाची स्तिथी कशी आहे याची पाहणी केल्या आले होते व सुधरणा उपाययोजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याकरिता सादर केल्या जात होत्या.

स्वतंत्र्यप्राप्तीनंतर योजनाबद्ध कृषी विकासाकरिता सतत प्रयत्न केले गेले. 1951 पासून पंचवार्षिक योजना आल्यात. पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी विकासाला प्राधान्य देण्यात आले. २००० मध्ये राष्ट्रीय कृषी धोरण जाहीर झाले. शाश्वत शेती, अन्नपोषण, सुरक्षा, कच्च्या मालाचे व्यस्थापन, शेतीसाठी प्रोत्साहन, शेतीमध्ये गुंतवणूका वाढविणे, जोखीम व्यवस्थापन, संस्थानात्मक रचना, ई. नीतीचे प्रमुख वैशिष्ट्ये होती. धोरणामुळे कृषीचा विकास साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

भारत सरकारने २८ जुलै २००० ला राष्ट्रीय कृषी नीतीची घोषणा केली. या धोरणाचा उद्देश हा होणाऱ्या कृषी विकासाला प्रेरित करणे व ग्रामीण आधारसंरचना मजबूत करणे होय. मूल्यवाढीला प्रोत्साहन देणे, कृषी व्यवसाय विकासाला गती देणे. ग्रामीण क्षेत्रात रोजगार निर्माण करणे, शेतकरी आणि श्रमिकांचे जीवनमान उंचावणे जीवनशैलीत सुधारणा करणे हा होता. ग्रामीण क्षेत्रातील स्थलांतर रोखणे. जागतिकीकरणांमुळे निर्माण झालेल्या समस्यांना थांबविणे, आव्हानांचा सामना करणे, हे ही उद्देश्य होता. भारतीय कृषीचा व्याप हा विस्तुत आहे, त्यामुळे विकासाच्या ज्या संभवना आहे त्यांच्या पूर्ण लाभ उठविणे हे ही लक्ष होते.

**कृषी धोरणाचा उद्देश:-**

१. कृषी क्षेत्रात ४ प्रतिशत पेक्षा अधिक समृद्धीदर प्राप्त करणे.

२. कृषी विकास अश्याप्रकारे निश्चित करणे की जो उपलब्ध संसाधनाचा पूर्णत: कौशल्यपूर्ण उपयोग करेल व भूमी, जल, जैविक विविधता ई. चे संरक्षण करेल.

३. विकासाबरोबर समानता आणणे म्हणजे सर्व राष्ट्रातील कृषकांना धोरणाद्वारे सारखाच लाभ प्राप्त होईल.

४. मागणीप्रेरित विकास होणे आणि कौटुंबिक गरजा ही पूर्ण होतील. उदारीकरण व वैश्वीकारणामुळे झालेल्या समस्यामुळे, निर्यातीत येणारी आव्हाने यांचा प्रयत्नपूर्वक विकास करणे.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 6

५. विकासाद्वारे पर्यावरण रक्षण करणे.

६. नवीन तंत्रज्ञानद्वारे आर्थिक विकास करणे.

**नीतीची मुख्य तत्व:-**

१. कृषी विकासाला गती देण्याकरिता मात्रात्मक प्रतिबंध नष्ट करणे व करून त्या अवधीत कृषी खाजगीकरण करून शेतकऱ्यांना संरक्षण प्रदान करणे. सरकारी नीतीचा हा एक भाग होता. साधन व तंत्रज्ञानादचा वापर करण्यात आला पाहिजे. शेतकऱ्यांना संरक्षण देण्याकरिता प्रत्ययाची सोय होणे आवश्यक आहे. मौसमानुसार होणाऱ्या किंमतील चढ व उतारामुळे होणारे नुकसानीपासून संरक्षण देणे गरजेचे आहे.

२. सरकारी वस्तूची किंमत कमी व जास्त करून स्थर्य आणता येतो. व जोखीमेपासून पासून सुटका करता येते. या नितीद्वारे कृषी विकास सहज होतो. रोजगाराच्या संधी ही प्राप्त होतात. आर्थिक बळकटी त्यामुळे मिळते.

३. खाजगी क्षेत्र गुंतवणूकीला कृषित प्रोत्साहन देणे महत्वाचे होय, कृषी संशाधन, मानव संसाधन विकास, धान्य कापणी व नंतर विपणन व्यवस्था क्षेत्र, ई. गुंतवणूक वाढविणे गरजेचे होते.

४. प्रौद्योगिकीतेचे त्वरित हस्तांतरण करणे, पुंजी प्रवाह सुरक्षित करणे, धान्य उत्पादनाकरिता सुरक्षित बाजारपेठा उपलब्ध करून देणे, या हेतूने खाजगी क्षेत्रावर भुमिकेवर अधिक भर देणे हे महत्वाचे तत्व त्यात आहे.

५. कृषीवर विश्वव्यापार संघटनने कराराद्वारे लावलेले प्रतिबंध काढल्याने वैश्विक विपणीतील वस्तूच्या किंमतीतील चढउतारातून होणाऱ्या हानीपासून कृषकांचे संरक्षण करणे. हे महत्वपूर्ण तत्व होय.

६. ग्रामीण विद्युतीकरणाला प्राथमिकता देणे. विद्युतीकरणाला गती मिळाल्यानंतर कृषी विकास होऊ शकतो.

७. कृषकांना संस्थाद्वारे कर्ज देणे, आर्थिक सहाय्यद्वारे विकास करणे हे होते.

८. फळबागा करणे, कृषी, पशुधन, कृषीधन ई. करीता प्राथमिकता देऊन सुधारणचे प्रयत्न करणे .

९. कृषकांना पॅकेज देणे, विमा पॉलिसी प्रदान करणे व त्याकरिता विशेष प्रयत्न करण्याचे निर्धारण होते.

१०. डेअरी, पशुपालन, कुकुटपालन या जोडधंद्यांना अग्रक्रम देणे.

**नीतीचा आधार:-**

**१. शाश्वत विकास:-** पोषणीय अथवा शाश्वत टिकावू विकास करणे हा होता दीर्घकालीन विकासाला चालना देण्याकरिता कृषीचा विकास करणे आणि पर्यावरण संरक्षण करण्याचा स्वीकार करण्यात आला. त्याकरिता खालील पर्याय दिले गेले.

अ. भूमीवरील जैविक दाबाला नियंत्रित व मर्यादित करणे व कृषी जमिनीच्या गैर कृषी जमिनीच्या परिवर्तनला रोखणे.

ब. जैविक कृषी व पोषक वातावरण व औषधी करिता परंपरागत पद्धतीने मुल्यांकन करणे व कृषी विकास करणे.

क. विविधतापूर्ण पद्धतीद्वारा उत्पादनाची तीव्रता वाढविणे.

ड. अप्रयुक्त, पडीत जमिनीला कृषी प्रयोगात आणणे. भूमी आणि मृदू संसाधानाद्वारे भूमीची गुणवत्ता वाढविणे.

**२. कृषीमध्ये गुंतवणूका वाढविणे:-** कृषीमध्ये गुंतवणूकीचे प्रमाण लक्षात घेऊन क्षेत्रीय विषमता कमी करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक गुंतवणूकी अधिक वाढविणे व प्रोत्साहन देणे हे महत्वाचे होते मानव संसाधन विकास, कृषी अनुसंधान, उत्पादक सहकारी समिती, निगम क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याकरिता प्रोत्साहित करणे हा ही एक आधार होता.

**३. संस्थागत संरचना:-**

अ. भूमिहीन शेतकऱ्यांना रोजगार देणे, अतिरिक्त जमीन कृषी कार्य वापरून त्यावर करणे उत्पादकता वाढविणे, रोजगार देणे ई. व्यवस्था संस्थाद्वारा करण्या येत होती.

ब. जोताणे व्यवस्था:- शेती करण्याकरिता, नांगर करण्याकरिता बैलजोडी व्यवस्था करणे आवश्यक आहे. नांगरणी व्यवस्था करणे गरजे होती.

क. पट्टेधारकांना अधिकार देणे स्थायित्व देण्याकरिता शेतीची सुधरणा करणे गरजेचे होते.

ड. भूमी अभिलेखांकारिता संगणकाचा विस्तार करणे सोबतच कृषकांना जमिनीचे पासबुक देणे.

इ. पुरुषा प्रमाणे महिलांचा भूमीवर अधिकार आहे स्वीकार करणे व ही भवना रुजविणे.

**४. प्रोत्साहन:-** व्यवस्थेतील विसंगती दूर करून शेतकऱ्यांना भांडवल निर्मितीकरीता अनुकूल वातावरण देण्याकरिता प्रयत्न करणे आधार होता.

**५. आदान-प्रदान:-** सरकारद्वारे चांगल्या प्रतीचे बि-बोयाणे, रोप संरक्षण, रासायनिक खते, रोपण सामग्रीचे वितरण करणे, वितरण आणि खाजगी क्षेत्राच्या द्वारे विज प्रमाणन प्रणाली सुदृढ करणे, याकरिता प्राधान्य देणे. कृषीयांत्रिकीकरणाला चलना देणे ई. करिता प्रयत्न केल्या जात होता.

**६. जोखीम प्रबंध:-** भारतात नौसार्गिक आपत्तीमुळे कृषी अस्तित्व धोक्यात येतो. शेतकऱ्यांना जास्त प्रमाणात हानी पोहचते. याकरिता पिकविमा कवच सरकारद्वारा देऊन हानीपासून त्यांचे संरक्षण करण्यात येते.

या विकास योजनाद्वारे शेतकऱ्यांचे संरक्षण होईल व कृषी आत्मनिर्भर होईल.

**प्रभाव:-**

भारत सरकारला विश्वास आहे कि या धोरणाद्वारे दीर्घकालीन विकास होईल, ग्रामीण क्षेत्रात रोजगाराची निर्मिती होईल, शेतकरी समुदायाची राहणीमान सुधारेल व पर्यावरणात सुधारणा होईल. धोरणाच मुल्यांकन इंद्रधनुष्यात रंगाची छटा असे दिसते तश्या विकासाच्या छटा नविन आहे असे म्हटले जाते. हरित क्रांती, श्वेत क्रांती (दुध डेअरी) पिवळी क्रांती (खाद्य तेल), निळी क्रांती (मत्स्य) यांना चालना मिळाली आहे. त्यामुळे परिणामत: गृहीतक खरे ठरले आहे.

- हरितक्रांती, श्वेत करंत, पिवळी क्रांती, निळी क्रांती घडून आली. त्यामुळे विकासाला चलना मिळाली. व तशी झाली आहे.

- कृषी खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले आहे.
- विकासाच्या सर्व उद्देशचा समावेश आहे कि ज्यामुळे कृषित सुधारणा होईल.
- कृषी विकास हा राष्ट्राचा विकास आहे. ही भावना वाढीस लागली अआहे.
- राज्य सरकार विभिन्न योजनांद्वारा, प्रकल्प, राबवून कार्यक्रमाद्वारे कृषी विकासाकरिता प्रयत्न करण्यात येत आहे.

- हरितक्रांतीमुळे १९४० आणि १९६० च्या दशकात कृषी उत्पादनात वाढ झाली. उच्च प्रतीच्या बियांचा वापर केल्यामुळे उत्पादनात वाढ झाली.
- कृषी विद्यापीठाद्वारे संशोधन होत आहे.
- आंतरराष्ट्रीय मका व गहू सुधार केंद्राकडून आयात करण्यास सहकार्य करण्यात आले.
- कृषी विकासामुळे ग्रामीण विकास ही होत आहे.

**निष्कर्ष:-**

- धोरणांमुळे सकरात्मक बदल झाला व विकासाची गती वाढली.
- सध्या भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल मंदीकडून महामंदीकडे जाण्याकडे आहे, त्याची काळजी न घेतली नाहीतर दीर्घकालीन प्रतिकुल परिणाम भारताला भोगावे लागतील.
- नोटाबंदीनंतर बँकेत मोठ्या प्रमाणात रक्कम जमा झाल्यात त्यात बिगर बँकिंग वित्तीय कंपन्याना देऊनही थकीत कर्जाचे प्रमाण वाढत गेले.
- सरकारला मिळणारा महसूल कमी होत चालला आहे.
- देशाचा विकासदर (जी.डी.पी) सहा वर्षांत निच्चांकी स्तरावर आहे.
- असेच चालू राहिले तर तो ४.५०% राहील व वर्षाअखेरीस ५% राहण्याची शक्यता आहे.

धोरण कोणतेही असो त्याचा सकारात्मक पराभव पडतोच. त्यामुळे गृहीतक हे सत्य ठरलेले आहे.

## संदर्भग्रंथ:-

१. भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. झामरे

२. भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. मेघा कानेटकर

३. कृषी अर्थशास्त्र – डॉ. शिवभूषण गुप्ता

४. ग्रामीण विकास – कटार सिंह, अनिल शिशोदिया

५. लोकमत पेपर- १४ डिसेंबर २०१९.